सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर
जुने मॉरीस कॉलेज इमारत, नागपूर
क्रमांक:– उशिनाग/पदमान्यता/ ८८८/१४
दिनांक :– १२-२-१४

प्रति,

प्राचार्य / प्राचार्या
ग्रामगीता महाविद्यालय
चिमुर, जि. चंद्रपुर

विषय : अशासकीय महाविद्यालयातील सहा.प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक यांच्या पदास मंजुरी देण्याबाबत. ( वर्ष : २०१३-१४)

संदर्भ :
१) नागपूर विद्यापीठ,नागपूर पत्र क्र.ॲसी/सीओ/सी/४८७, दिनांक १९/०८/१९७६
२) एनजीसी:२०८०/१६०२८४(५९८७)–युएनआय–२, दिनांक १/६/८१
३) शासन निर्णय क्रमांक एनजीसी/१२८६/(१२२४)/विशि–४, दिनांक २७/२/१९८९.
४) शासन निर्णय क्र.युएसजी/१०९३/(५९१८)माशि–२, दिनांक १७/५/९४
५) शासन निर्णय क्र.एनजीजी/१०९३/(५९१८)माशि–३, दिनांक १९/६/९५
६) शासन निर्णयक्र.युएसजी/१९९६/३४२४/प्र.क्र.४०९९/विशि–४, दिनांक २२/५/९६
७) शासन निर्णय क्र.युएसजी/१२९२/२६४७/विशि –४, दिनांक १६/१०/१९९७
८) शासन निर्णय दिनांक ११/१२/१९९९
९) शासन निर्णय क्र.संकीर्ण–२०११/(२५/११)विशि–१, दिनांक १५/२/२०११
१०) शासन निर्णय क्र.एनजीसी२०१०(४१५/१०)–विशि–१, दिनांक २६/१०/१०
११) मा.शिक्षण.सचालक, पुणे यांचे दिनांक ११/८/२०११चे पत्र
१२) आपला प्रस्ताव क्र. दिनांक

महोदय/महोदया,

दिनांक १७/५/९४ चे शासन निर्णयान्वये सहसंचालक,उच्च शिक्षण यांना अशासकीय **अनुदानित** महाविद्यालयातील सहा.प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक पदांना मंजुरी देण्याबाबतचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. या आदेशाचे अधिन राहून व उपरोक्त संदर्भांकित क्रमांक १ ते ९ चे आदेशानुसार विषयनिहाय कार्यभार निश्चित करण्यात येत आहे. तसेच तदनुषंगाने पुढीलप्रमाणे विषयनिहाय पदमान्यता २०१३ – १४ या वर्षाचे स्थिर विद्यार्थी संख्येच्या आधरावर करून देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विषय | विद्यार्थी संख्या | एकूण कार्यभार तासिकांमध्ये | एकूण अनुज्ञेय पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अतिरिक्त पदे | सहयोगी प्राध्यापक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | प्राचार्य | 53 | — | १ | — | 1 | | | |
| २. | शारीरिक शिक्षक निर्देशक | 53 | — | 1 | — | 1 | | | |
| ३. | ग्रंथपाल | 53 | — | १ | — | 1 | | | |
| ४. | मराठी | 22 | 03 | — | — | — | | | |
| ५. | इंग्रजी | 22 | 04 | — | — | — | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. | प्राणीशास्त्र | 02 | - | - | - | - | | | |
| ७. | भौतिकशास्त्र | 23 | 26 | 1 | - | 1 | | | |
| ८. | गणित | 24 | 20 | 1 | - | 1 | | | |
| ९. | वनस्पतीशास्त्र | - | - | - | - | - | | | |
| १० | रसायनशास्त्र | 27 | 36 | 2 | - | 2 | | | |
| ११ | सुक्ष्मजीवशास्त्र | 28 | 36 | 2 | - | 2 | | | |
| | | | | 9 | - | 9 | | | |

टिप :- १) शासन आदेश दिनांक 2 जानेवारी २०१३ मधील अटी व शर्ती क्र. 3 नुसार शासन परीपत्रक २४ सप्टें १९९३ अन्वये विहीत केलेली विद्यार्थी संख्येचे निकष पूर्ण करणे बंधनकारक आहे. सदर विद्यार्थी संख्येचे निकष पूर्ण केल्याशिवाय वेतन अनुदान देय होणार नाही, त्याची नोंद घ्यावी.

2) प्राणीशास्त्र व वनस्पतीशास्त्र विषयात पुरेशी विद्यार्थी संख्या नसल्याने कार्यभाराची गणना करण्यात आली नाही.

प्राध्यापकांची पदे पुढीलप्रमाणे अनुज्ञेय राहतील:—

**एकूण सहयोगी प्राध्यापक,**

१. सहयोगी प्राध्यापकांची मंजूर पदसंख्या :—

२. एकूण सहयोगी प्राध्यापक पदांच्या १० टक्के :—

३. गुणवत्तेवर आधारीत पदोन्नतीने भरावयाचा कोटा — (७५टक्के):— पूर्णांक:—

४. सरळसेवेने/प्रतिनियुक्तीने भरावयाचा कोटा — (२५टक्के):— पूर्णांक:—

**एकूण प्राध्यापक पदे**

सहसंचालक,उच्च शिक्षण
नागपूर विभाग,नागपूर.

नियमानुसार नियुक्त सहा.प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक यांच्या पदावरील खर्च अनुदानास पात्र धरण्यात येईल. आपले महाविद्यालयास पुढील अटीचे अधिन राहून पदे अनुज्ञेय आहेत.

१) आपल्या महाविद्यालयातील अनुदानित तुकडयांमधील आपण दाखविलेली वर्षनिहाय/वर्गनिहाय विद्यार्थी संख्या ही प्रत्यक्षात पदावर असणे आवश्यक आहे.

२) व्याख्याते/टयुटरियल यासाठी दाखविलेल्या तासिका संबंधीत सहा.प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक यांनी वेळापत्रकानुसार प्रत्यक्ष घेणे आवश्यक आहे.

३) **मान्य पदावर** नियुक्त केलेल्या सहा.प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक यांनी शासनाने वेळोवेळी निर्धारीत केल्याप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाचे शिफारसीनुसार शासनाने मान्य केलेली शैक्षणिक अर्हता प्राप्त असणे आवश्यक आहे. तसेच या सहा.प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक यांचे नेमणूकीस विद्यापीठाची मान्यता असणे आवश्यक आहे.

४) **ही मान्यता** पदांना वेतन अनुदान देण्याच्या संदर्भात आहे. त्या पदावरील नेमणूका अस्तित्वात असलेल्या विद्यापीठाच्या व शासनाच्या सर्व संबंधीत नियमानुसार केलेल्या असाव्यात.

५) **विषयाची व** विद्याशाखेची तुकडी किमान विद्यार्थी संख्या शसनाने वेळोवेळी विहीत केलेल्या १९ जून १९९५ च्या निकषानुसार बसावी.

६) **संबंधीत** विषयाची/तुकडीची विद्याशाखेची मान्यता शासनाने अनुदान तत्वावर दिली असेल तरच तात्पूरता कार्यभार मान्य समजण्यात येईल.विना अनुदान तुकडयावरील सर्व खर्च अनुदान निर्धारण करतांना अमान्य करण्यात येईल. व अशा तुकडया/विषयाचा कार्यभार पदमान्यतेसाठी विचारात घेतला जाणार नाही.

७) **कोणत्याही** शैक्षणिक अर्हतेनुसार अपात्र व विद्यापीठाकडून मान्यता न मिळालेल्या तसेच बिना अनुदान तत्वावरील तुकडी/ विषयाच्या कार्यभारासाठी नियुक्त सहा.प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक यांच्या वेतनावरील अनुदान देय होणार नाही.

८) **अनुज्ञेय पदापेक्षा** ज्यादा ठरणा–या सहा.प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक यांच्या तसेच विहीत शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवार उपलब्ध असतांनाही बिगर शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवाराची नियुक्ती केली असल्यास अशा अपात्र सहा.प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक यांच्या वेतनावरील खर्च अनुदान निर्धारणासाठी ग्राहय मानल्या जाणार नाही.

९) **दिनांक १/१०/२०१३** या वर्षाच्या स्थिर विद्यार्थी संख्येच्या आधारावरच विषयावर थेट मान्य करण्याचे आदेश असले तरी सन २०१३ – २०१४ वर्षात जी विद्यार्थी संख्या उपलब्ध आहे. त्या आधारावरच एखाद्या विषयाचे पद मान्य होत नसल्यास ते भरता येणार नाही.

१०) **कार्यभार निर्धारणामध्ये** चुकीची विद्यार्थी संख्या दर्शविल्या व त्यानुसार संबंधीत विषयाचे पद भरलेले असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत पदावरील केलेली नेमणूक त्यांचे वेतन प्राचार्य यांच्या पगारातून वसुल करण्यात येईल.

११) **मागासवर्गीयांची भरती**/पदोन्नती नियमाप्रमाणे/शासन आदेशाप्रमाणे झालेली आहे किंवा नाही याकरीता बिंदू नामावली तयार करुन विद्यापीठाच्या मागासवर्गीय कक्षाकडून तपासून घेणे आवश्यक आहे. व त्यानंतर शासन परिपत्रक दि.०५.११.२००९ प्रमाणे सहा.आयुक्त, मागासवर्गीय कक्ष यांचेकडून अंतीम मान्यता घेणे आवश्यक आहे

१२) **सदर मंजुरी** आदेशाबाबत काही आक्षेप असल्यास प्राप्त झाल्याचे दिनांकापासून **आठ** दिवसाचे आत अपील करावी, अन्यथा आपला आक्षेप ग्राहय होणार नाही

केवळ वरील सर्व अटीची पुर्तता करीत असलेल्या नियुक्त सहा.प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक यांच्या पदवारील खर्च अनुदानास पात्र धरण्यात येईल.

**सहसंचालक,उच्च शिक्षण**
**नागपूर विभाग,नागपूर.**

महाराष्ट्र शासन
सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
जुनी मॉरीस कॉलेज इमारत परिसर, नागपूर
Website: dirhe.org.in/jdnagpur/
Email: jdhengp@rediffmail.com
Phone No. 2561713
Fax No. 2554210

क्रमांकः- उशिनाग/शिक्षक/ना.हप्र./३८८६
दिनांकः- १५.६.१८

प्रति,

~~प्राचार्य~~, अध्यक्ष
सेमाना विद्या व वनविकास
प्रशिक्षण मंडळ, गडचिरोली

विषयः- खुल्या व मागास संवर्गातील रिक्त पदे भरण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.

संदर्भः-
१. शासन निर्णय क्रमांक असंक १००१/प्र.क्र.२९/भाग-६/२००४/वित्तीय सुधारणा-१, दिनांक १.७.२००४.
२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म.रा.पुणे यांचे पत्र क्रमांक उशिसं/खप्ररिप/२००४/प्रशा-२, दिनांक ९.७.२००४.
३. या कार्यालयाचे पत्र क्र. उशिनागअनु-४/रिक्तपदे/२६३१/०४, दिनांक २/८/२००४
४. शासन परिपत्रक क्रमांक बीसीसीस-२००९/प.क्र २९१/०९/१६ ब दिनांक ५ नोव्हेंबर२००९
५. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००९(४३५/०९)विशि-३, दिनांक ३० जानेवारी २०१०.
६. मा.शिक्षण.संचालक, उच्च शिक्षण, म.रा.पुणे यांचे पत्र क्रमांक अशाम/संकीर्ण/२०१०/याचिका क्र. २२१६/२००६/पदभरती/६९६६, दिनांक ४/०२/२०१०.
७. या कार्यालयाचे पत्र क्रमांक उशिनाग/नाहरकतप्र/११६८/१०, दिनांक २४/२/२०१०
८. मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण, म.रा.पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/२०११/अपंग पद भरती/मवि-१/३५७७, दिनांक ३०/०८/२०११ व या कार्यालयाचे पृष्ठांकन पत्र उशिनाग/६१३३/११, दि. ९/९/२०११.
९. आपले पत्र क्रमांक GMC/568/18 दिनांक 29/06/2018
१०. शासन निर्णय क्र: 2013/448/13/विशी-1, दिनांक 22/1/2018.

उपरोक्त विषयाच्या संबंधात या कार्यालयाचे पत्र दि. २४/२/२०१० व दिनांक ३० जानेवारी, २०१० च्या शासन निर्णयान्वये शासनांनी दिलेल्या आदेशान्वये तसेच आपल्या संदर्भांकीत पत्रान्वये आपण मागितलेली खुल्या/मागास संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता पुढील अटीच्या अधीन राहून हया कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१. शासन निर्णय दिनांक ३० जानेवारी २०१० मधील शासनाने घालून दिलेल्या अटीच्या आधीन राहूनच हे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.
२. सदर पदांच्या नियुक्तीसाठी राज्यातील प्रमुख दोन वर्तमानपत्रात जाहीरात देणे आवश्यक राहील.
३. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे हयांचे ना-हरकत प्रमाणपत्र खुल्या संवर्गातील घेणे बंधनकारक राहील आणि मा. शिक्षण संचालक यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यासाठी आपल्या पत्रामध्ये प्रदाचे विषय नमुद करूनच शिक्षण संचालनालयाकडे अर्ज सादर करावा.
४. नागपूर विद्यापीठाच्या मागासवर्गीय कक्षानी रिक्त असलेल्या पदास आरक्षण निश्चिवरून पद खुल्या/मागासवर्गीयासाठी आरक्षण निर्धारणास मा.सहा.आयुक्त(मावक) नागपूर विभाग,नागपूर यांचेकडून प्रमाणित करून अंतिम मान्यतेच्या अधीन राहून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.
५. बिगर अहर्ताधारक उमेदवारांच्या नियुक्त्या केल्यास अशा उमेदवारांची नियुक्ती मान्य केल्या जाणार नाही तसेच त्यांचे वेतन अनुदान दिले जाणार नाही.
६. आपले महाविद्यालयातून अतिरिक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची पद भरता येणार नाही.
७. सन २०००-०१ चे पदनिर्धारणानुसार शिल्लक असलेली अनुषेशाची पदे भरणे बंधनकारक आहे.त्याचे काटेकोरपणे पालन करावे.

......२.

9422909588

दाखल -

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur. Dist. Chandrapur

८. शिक्षक कर्मचा-यांची नियुक्तीच्या वेळी आपल्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी संख्येनुसार सदर पद कायमी [illegible] संबंधित शिक्षकांना नियुक्ती आदेश देवू नये त्यामध्ये सदर शिक्षक कर्मचारी अतिरिक्त ठरणार नाही अशा प्रमाणे कार्यवाही करावी.

९. या कार्यालयाचे आदेशानूसार ज्या पदावरील अतिरिक्त शिक्षक कर्मचारी आपणाकडे समायोजन करीता पाठविले असतरा त्या पदावरील कायम कर्मचारी नसल्यास त्याची सेवा तात्काळ संपुष्टात आणावी.तसे न केल्यास संबंधितांच्या वेतनाची जबाबदारी आपणावर राहील याची जाणीव असू दयावी जर महाविद्यालयाचे शिक्षक समायोजनांतर्गत दुसऱ्या महाविद्यालयात गेले असेल.

१०. आपल्या महाविद्यालयामध्ये कर्मचाऱ्यांचे न्यायालयीन प्रकरण असल्यास यामध्ये मा.न्यायालयांनी दिलेल्या आदेशानूसार कार्यवाही करावी.जेणे करून अशा प्रकरणात मा.न्यायालयाचा अवमान होणार नाही.याची दक्षता घ्यावी.

११. आपल्या महाविद्यालयातील शिक्षकेत्तर संवर्गातील अपंग अनुशेष रिक्त असल्यास तात्काळ भरण्याबाबत प्रामुख्याने दक्षता घ्यावी.(पत्र दि. १९/९/११).

१२. या कार्यालयाकडून नाहरकत प्रमाणपत्र घेतल्यानंतर महाविद्यालयाव्दारे पदे भरण्यात येतात. सदर नियुक्त शिक्षक कर्मचा-यांना विद्यापीठाकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर, नविन नियुक्त शिक्षक कर्मचा-यांची आठ दिवसांचे आंत बिंदू नामावलीत नोंद घेवून सदर बिंदू नामावली विद्यापीठ(विशेष विभाग),नागपूर तसेच मा.सहा.आयुक्त (मागासवर्गीय कक्ष), नागपूर यांचेकडून प्रमाणित केल्याची प्रत या कार्यालयास सादर करावी, हयाची प्रामुख्याने नोंद घ्यावी. त्यानंतरच सदर कर्मचा-याचे वेतन या कार्यालयाव्दारे सुरू करण्यात येईल.

| अ.क्र. | विषयाचे नाव | एकूण रिक्त पदे | संवर्ग | अपंग |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४ | ५ |
| 1) | प्राचार्य | 1 पद | 1 पद खुला संवर्ग | 1 पद अपंग संवर्ग |
| 2) | ग्रंथपाल | 1 पद | 1 पद खुला संवर्ग | |
| 3) | शारीरीक शिक्षण क्रिडा शिक्षक | 1 पद | 1 पद खुला संवर्ग | |
| | | | 1 पद खुला संवर्ग | |
| 4) | भौतिक शास्त्र | 1 पद | 1 पद अ.जा संवर्ग | |
| 5) | गणित | 1 पद | 1 पद खुला संवर्ग | |
| 6) | रसायनशास्त्र | 2 पदे | 1 पद इमाव संवर्ग | |
| 7) | सुक्ष्मजीवशास्त्र | 2 पदे | 1 पद अ.जा. संवर्ग | |
| | | | 1 पद वि.जा(अ) संवर्ग | |
| (सदर पदे ग्रामगिता महाविद्यालय, चिमूर, जि. चंद्रपूर या महाविद्यालयातील आहेत.) | | | | |

टिप :- शासन आदेश दिनांक ४।।13 मधील अटी व शर्ती क्र. 3 नुसार शासन परिपत्रक २४ व ८३ अन्वये विहीत केलेली विद्यार्थी संख्येचे निकष पुर्ण करणे बंधनकारक आहे. सदर विद्यार्थी संख्येचे निकष पुर्ण केल्या शिवाय वेतन अनुदान देय होणार नाही ह्याची नोंद घ्यावी.

(डॉ.डी.बी.पाटील)
सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग,नागपूर

प्रत-१. मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य,पुणे यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव सादर
२. कुलसचिव,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर यांना माहितीस्तव सादर

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur